महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पी.आर-३/सबसिडी/** 24229 **दिनांक :** 30 JUL 2016

## वाणिज्य परिपत्रक क्र.२६६

**विषय :-** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२९.०६.२०१६.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. पीआर-३/विदर्भ व मराठवाडा/२१२६५ दि.०५.०७.२०१६.

विदर्भ व मराठवाडा या प्रदेशातील औद्योगिक विकासास चालना देण्याकरिता या विभागाचा उर्वरित महाराष्ट्र तसेच शेजारील राज्यांच्या औद्योगिक व इतर घटकांचा तुलनात्मक अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरिता शासनाने विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली एक आंतरविभागीय समिती गठीत केली होती. सदर आंतरविभागीय समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी निश्चित करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती नियुक्त करण्याचा निर्णय झाला. सदर सचिव समितीने, आंतर विभागीय समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी निश्चित केल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक २४ मे, २०१६ रोजी मंत्रीमंडळासमोर सादर केलेल्या प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठित करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचा सांगोपांग विचार करुन शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये वरील परिक्षेत्रातील विद्युत ग्राहकांना (अ) इंधन समायोजन आकार , (ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित व (क) नवीन उद्योगांकरिता प्रोत्साहनपर सवलत देण्याबाबत निर्णय घेतला आहे.

**१) सवलती** :-

**अ) इंधन समायोजन आकार सवलत :-**

- विदर्भातील उद्योगांना : ४० पैसे प्रती युनिट,
- मराठवाडयातील उद्योगांना : ३० पैसे प्रती युनिट व
- उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांना : २० पैसे प्रती युनिट

इतकी इंधन समायोजन आकारात सवलत देण्यात येत आहे.

इंधन समायोजन आकार वरील सवलतीपेक्षा कमी झाला तरी वरीलप्रमाणे देय असलेली सवलत ग्राहकांना अनुज्ञेय राहिल.

**ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत :**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या वीजदर आदेशामधील अनुज्ञेय असलेल्या २६% पर्यंतच्या सवलतीचा लाभ घेणा-या औद्योगिक ग्राहकांना ते लाभ घेतील त्या प्रमाणात त्यांना खालीलप्रमाणे सवलत देण्यात यावी.

| तपशिल | | कार्यक्षमता २६ % पर्यंतची श्रेणी | विदर्भ पैसे/युनिट | मराठवाडा पैसे/युनिट | उत्तर महाराष्ट्र पैसे/ युनिट | D,D+ झोन पैसे/युनिट |
|---|---|---|---|---|---|---|
| औद्योगिक, कंटीन्युअस वर्गवारी, (एक्सप्रेस फिडरवर) | | ०-५ % | ३० | २५ | १० | ५ |
| | | >५%-१०% | ७० | ६५ | १५ | १० |
| | | >१०%-१५% | ९० | ८० | १५ | १५ |
| | | >१५%-२०% | १५२ | १०० | २५ | २० |
| | | >२०% | १४० | १०० | २५ | २० |
| औद्योगिक, नॉन कंटीन्युअस वर्गवारी, (नॉन एक्सप्रेस फिडरवर) | | ०-५ % | ३० | २५ | १० | ५ |
| | | >५%-१०% | ७० | ६५ | १५ | १० |
| | | >१०%-१५% | ९० | ८० | १५ | १५ |
| | | >१५%-२०% | ११२ | १०० | २५ | २० |
| | | >२०% | १०२ | ८७ | २५ | २० |
| लघुदाब औद्योगिक ग्राहक | | ०-५ % | ६० | ५० | २० | १० |
| | | >=५% | ९० | ८० | ४० | २५ |

**क) नवीन उद्योगांकरिता प्रोत्साहनपर सवलत :-**

इंधन समायोजन आकार व उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलतीं शिवाय

- विदर्भ व मराठवाडा विभागात स्थापित होणा-या नवीन उद्योगांकरिता रुपये ०.७५ प्रती युनिट,
- उत्तर महाराष्ट्र, D व D+ झोन मध्ये स्थापित होणा-या नवीन उद्योगांकरिता रुपये ०.५० प्रती युनिट अशी अतिरिक्त सवलत देण्यात येत आहे.

सदरील सवलतीबाबत महावितरण कंपनीने शासनाकडे संदर्भ क्र. २ अन्वये मागदर्शन मागितलेले आहे. त्याबाबत शासन आदेश प्राप्त झाल्यावर त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात येईल.

दरम्यान शासनाकडून पुढील आदेश मिळेपर्यंत खालील अटी व शर्तीनुसार सवलत देण्यात येईल.

१. सदर सवलतीचा लाभ दि.२९.०६.२०१६ पासूनच्या वीज वापरावर देय असेल.
२. लघुदाब यंत्रमाग उद्योगास शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१७५/ऊर्जा-५ दि.३ डिसेंबर २०१५ नुसार सवलतीचा वीज दर प्रति युनीट रु. २.६६ ठरविण्यात आलेला असून त्यामुळे लघुदाब यंत्रमाग उद्योगास शासन निर्णय दि.२९.०६.२०१६ लागू राहणार नाही.
३. वरील सवलती हया औद्योगिक, कंटीन्युअस वर्गवारी, (एक्सप्रेस फिडरवर) व औद्योगिक, नॉन कंटीन्युअस वर्गवारी, (नॉन एक्सप्रेस फिडरवर) यावर आधारित राहतील.
४. सवलत दिलेल्या रक्कमेवर विद्युत शुल्क, वीज विक्रीकर तसेच इतर सरकारी शुल्क आकारण्यात येतील.
५. उपरोक्त सवलत ही फक्त जे ग्राहक स्वत:साठी आवश्यक असलेली १०० टक्के वीज महावितरण कंपनीमार्फत घेतील अशा विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांनाच लागू राहिल. ग्राहकाने मुक्त प्रवेश / अंशिक मुक्त प्रवेश स्ववापर तसेच अंशिक स्ववापर वगैरे कोणत्याही प्रकारे वीज पुरवठा केल्यास अशा ग्राहकांसाठी सदरची सवलत लागू करण्यात येणार नाही.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

30.7.16

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :-**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

--- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्चदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत व या योजने अतंर्गत लाभ देण्यात येणा-या औद्योगिक ग्राहकांना संपूर्ण तपशिल उदा. ग्राहकाचे नांव, वर्गवारी, दरमहा वापर, त्यावर अनुज्ञेय असलेली सवलत व प्रत्यक्षात देय सवलतीची रक्कम याबाबत स्वतंत्र अभिलेख ठेवावा जेणेकरुन शासनाकडून अनुदानाची मागणी करण्यात येईल.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**